दैनिक पुढारी दि. १०/०५/२०२५

PRINCIPAL

# जाहीर लिलाव

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर येथील जुन्या वाहनाचे निर्लेखन करावयाचे आहे. सदर MH ०९ डीए ८६६७ बोलेरो एस एल ई वाहन चालू कंडीशनमधील सुस्थितीत जिथे आहे, त्याच स्थितीत लिलावाद्वारे विकणे आहे. इच्छुक बोलीदाराने सदर वाहनाची पाहणी दिनांक ११/०५/२०२५ ते १८/०५/२०२५ या कालावधीत कार्यालय चालू असताना कार्यालयीन वेळेत सकाळी ०९.४५ ते संध्याकाळी ०६.१५ पर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर येथील कार्यालयात करावी. तसेच दिनांक १९/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० पर्यंत प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालयजवळ, कोल्हापूर- ४१६००३ येथील कार्यालयात लिलावासाठी उपस्थित रहावे. सदर लिलावाबाबतची सविस्तर माहिती मंडळाच्या http://www.mpcb.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
(प्रमोद रा. माने)
प्र. प्रादेशिक अधिकारी, कोल्हापूर

on Sahakari Sakhar Karkhana Ltd,
aon (BK), Shivnagar, Tal. Baramati, Dist, Pune

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर येथील बोलेरो एम एच ०९ डीए ८६६७ वाहन निर्लेखन करण्याचे आहे. वाहन ज्या अवस्थेत आहे त्या अवस्थेत लिलावाद्वारे विक्रीकरण्यासाठी जाहिरात देण्यात येत आहे. सदर वाहनाची माहिती खालील प्रमाणे आहे.

निर्लेखित करण्यात येणाऱ्या वाहनााचा तपशिल

| अ.क्र | वाहन क्र. | वाहनाचा प्रकार | वाहन खरेदी दिनांक | लिलावाचा दिनांक व वेळ | वाहन पाहण्याचे व लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | MH09-DA-8667 | Boler S.L.E. 7 str. | 02/09/2014 | 19/05/ 2025 | प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालयजवळ, कोल्हापूर-४१६००३ |

अटी व शर्ती

१. बोलिदाराने अनामत रक्कम रु. ५०००/- रोखिने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उप-प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर येथे लिलावाच्या वेळी जमा करावी.

२. दि. ११/०५/२०२५ ते १८/०५/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत वर नमुद केलेल्या ठिकाणी वाहन पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

३. दि. १९/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत बोलिदाराने प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालयजवळ, कोल्हापूर-४१६००३ येथे लिलाव करण्याकरिता हजर रहावे.

४. उच्चतम बोलिदाराने लिलावाची रक्कम धनाकर्षाद्वारे (DD) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण, कोल्हापूर यांच्या नावे जमा करावे.

५. सदर धनाकर्ष जमा झाल्यानंतर बोलिदारास वाहनाचा ताबा व गेटपास देण्यात येईल.

६. सदर वाहन विक्री करण्याचे अंतिम अधिकार सक्षम प्राधिकारी यांना आहे. ( प्रक्रिया थांबवणे व पुढे ढकलणे किंवा रद्द करणे इत्यादी.)

७. बोलिदारास आधार कार्ड व वास्तव्याचा पुरावा सादर करावा लागेल.

८. वाहनाच्या बाबत न्यायिक क्षेत्र कोल्हापूर राहिल.

९. सदर वाहन उच्चतम बोलिदाराने विकत घेतल्या नंतर सदर वाहनावरील "महाराष्ट्र शासन" लिहलेले काढण्यात यावे, तसेच वाहनाचा भविष्यात गैरउपयोग/अपघात वगेरे झाल्यास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उपप्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर जबाबदार राहणार नाही. त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी वाहन खरेदीदाराकडे राहिल.

१०. यशस्वी झालेल्या उच्चतम बोलिदाराने मंडळातील वाहन खरेदी केल्यानंतर वाहनाची विल्हेवाट लावावयाची असल्यास स्वत: प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधून कार्यवाही करावी. मंडळातील जुने वाहन खरेदी केल्यानंतर मंडळ कोणत्याही कार्यवाहीसाठी जबाबदार राहणार नाही.

११. बोलिदाराने वाहन घेताना रु. 100 च्या स्टँप पेपरवर हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहन विक्री नंतर कर भरणे या बाबी वाहन खरेदीदार यांना बंधनकारक राहिल.